# वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पश्चिम), जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०३
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** 2229

विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- 02/02/ २०२६

---

विषय :- सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा सुर्या उद्भव १०० द.ल.ली (सुर्या टप्पा १ व ३) क्षमता योजनेच्यां जलवाहिन्यांची देखभाल दुरुस्ती करणे कामी सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा सुर्या उद्भव १०० द.ल.ली (सुर्या टप्पा १ व ३) क्षमता योजनेच्या जलवाहिन्यांची देखभाल दुरुस्ती करणे कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम | :- | रु. ४,६९,५६,५२१/- (१२% GST सह ) |
| प्रशासकीय मान्यता | :- | मा.आयुक्त तथा प्रशासक ठराव क्र. २१० दि. ११/०५/२०२२ |
| संविदा मंजूरी | :- | मा. प्रशासकीय ठराव क्र. ७३३ दि. ०८/०८/२०२२ |
| मंजूर ठेकेदार | :- | मे. के. आर. कंन्स्ट्रक्शन |
| निविदा रक्कम | :- | रु.४,२५,५८,७८०/- (१२% GST सह) |
| मंजूर दर | :- | ३.२५% जादा दराने |
| स्विकृत निविदा किंमत | :- | रु.४,३९,४१,९४०/- (१२% GST सह) |
| करारनामा | :- | दि. २९/०८/२०२२ ने स्वाक्षाकींत केला आहे. |
| कार्यादेश | :- | जा.क्र. व.वि.श.म./पापु /४८४/२०२२ दि. २९/०८/२०२२ |
| कामाची मुदत | :- | दि. २८/०८/२०२५ पर्यंत |

सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा सुर्या उद्भव १०० द.ल.ली (सुर्या टप्पा १ व ३) क्षमता योजनेच्या जलवाहिन्यांची देखभाल दुरुस्ती करणे कामी लघूत्तम निविदाकार मे. के. आर. कंन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस मा.आयुक्त तथा प्रशासक ठराव क्रं. ७३३ दि.०८/०८/२०२२ अन्वये रक्कम रु.४,३९,४१,९४०/- (१२% GST सह) इतकी प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्राप्त आहे. त्यानुसार दि. २९/०८/२०२२ रोजी करारनामा करण्यात येऊन जा.क्र. व.वि.श.म./पापु /४८४/२०२२ दि. २९/०८/२०२२ अन्वये मे. के. आर. कंन्स्ट्रक्शन यांस कार्यादेश देण्यात आला असुन कामे प्रगतीपथावर आहेत. सदर कामाची मुदत ही दि. २८/०८/२०२५ पर्यंत असुन सद्य:स्थितीत संपुष्ठात आली आहे. सदर निविदेअंतर्गत आजतागायत दुसऱ्या धावत्या देयकाअंती माहे ऑगस्ट २०२४ पर्यंत रक्कम रु.२,८६,७८,३२२/- (१८% GST सह) इतका खर्च झाला आहे व त्या पुढे माहे ऑगस्ट, २०२५ पर्यंत केलेल्या कामापोटी रक्कम रु. १.३५ कोटी इतका खर्च अपेक्षित असून रक्कम रु. १७,६३,६१८/- इतकी बचत होत आहे.

उपरोक्त कामी सन २०२५-२०२६ वित्तीय वर्षाकरीता नव्याने निविदा कार्यवाही सुरू केली असून संविदा मंजूरीकरीता अंतिम टप्प्यात आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक जाहिर झाल्याने आचार संहिता कालावधीत नवीन ठेकेदाराच्या नियुक्ती करण्यास कालापव्यव झाला आहे.

पाणी पुरवठा ही अत्यावश्यक व जिवनावश्यक बाब असल्याने नविन ठेकेदाराच्या नियुक्ती अभावी महानगरपालिकेची संभाव्य गैरसोय टाळण्याकरीता मे. के.आर.कंन्स्ट्रक्शन यांच्यामार्फत पाणी पुरवठा देखभाल दुरुस्तीची कामे माहे सप्टेंबर, २०२५ पासुन आजतागायत मंजूर दरानुसार करुन घेण्यात आली असून शहरास होणारा पाणी पुरवढ़ा सुस्थितीत ठेवला आहे.

उपरोक्त कामी सन २०२५-२०२६ वित्तीय वर्षाकरीता नवीन ठेकेदाराची नियुक्ती होईपर्यंत मे. के. आर. कंन्स्ट्रक्शन यांच्या मंजूर निविदेस माहे ३१ मार्च, २०२६ पर्यंत मुदतवाढ देणे आवश्यक असुन माहे ३१ मार्च, २०२६ पर्यंत अंदाजे रक्कम रु. ४० लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च निविदेच्या मुळ प्रशासकीय व वित्तीय मान्यतेच्या रक्कमेवर अतिरिक्त होणार असल्याने रक्कम रु. ४,७९,४१,९४०/- (१८%GST सह) खर्चास सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता आवश्यक आहे. उपरोक्त कामाची निविदा प्रसिध्द करतेवेळी १२% GST गृहीत धरुन मंजूर करण्यात आली होती. परंतू निविदेअंतर्गत आजतागायत झालेला व होणारा खर्च हा १८% GST सह असल्याने ६% तफावती पोटी रक्कम रु. २४,३७,७२६/- इतका खर्च अधिक झाला आहे.

"महाराष्ट्र सार्व. बांधकाम नियम पुस्तिकामधील नियम १३४ ब नुसार एखाद्या कामात फेरबदल करावयाचे असतील अशा प्रकरणी आवश्यक असेल तेथे तपशिलवार पुरक किंवा सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्याची वाट न बघता सक्षम प्राधिकरणाची सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळाली पाहिजे असे निर्देश आहेत." सदर तरतुदीनुसार अतिरिक्त खर्च मुळ निविदेच्या प्रशासकीय व वित्तीय मान्यतेच्या रक्कमेवर गृहीत धरता निविदेअंतर्गत याकामी एकूण होणाऱ्या रू. ४,७९,४१,९४०/- (१८% GST सह) खर्चास सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता आवश्यक आहे.

तरी सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा सुर्या उद्भव १०० द.ल.ली (सुर्या टप्पा १ व ३) क्षमता योजनेच्या जलवाहिन्यांची देखभाल दुरुस्ती करणे कामी मे. के. आर. कंन्स्ट्रक्शन यांच्या निवीदेस भाववाढ न देता माहे दि. ३१ मार्च, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यास व होणाऱ्या रक्कम रु. ४,७९,४१,९४०/- (१८% GST सह) खर्चास खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांची सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस्तव सविनय सादर.

---

**ठराव** :- १) पाणी पुरवठा ही अत्यावश्यक व जिवनावश्यक बाब असल्याने जलवाहिनी नादुरुस्त झाल्यास नविन ठेकेदाराच्या नियुक्ती अभावी महानगरपालिकेची संभाव्य गैरसोय टाळण्याकरीता मंजूर निविदेअंतर्गत मंजूर दरानुसार मे. के.आर.कंन्स्ट्रक्शन यांस कडून माहे ऑगस्ट, २०२६ ते आजतागायत केलेल्या कामास मंजूरी देण्यात येत आहे.

२) सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा सुर्या उद्भव १०० द.ल.ली (सुर्या टप्पा १ व ३) क्षमता योजनेच्या जलवाहिन्यांची देखभाल दुरुस्ती करणे कामास मे. के. आर. कंन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस माहे दि. ३१ मार्च, २०२६ पर्यंत कोणतीही मुल्यवर्धीत भाववाढ न देता मुदतवाढ देण्यात येत आहे.

३) उपरोक्त कामी मे. के.आर. कंन्स्ट्रक्शन यांच्या निविदेअंतर्गत माहे दि. ३१ मार्च, २०२६ पर्यंत होणारा अपेक्षित खर्च गृहीत धरुन रक्कम रु. ४,७९,४१,९४०/- (१८% GST सह) खर्चास सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

मनोजकुमार सुर्यवंशी ( भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

**वसई विरार शहर महानगरपालिका**
मुख्य कार्यालय, विरार (पश्चिम), जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०३
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** 2222

विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- 02/02/२०२६

---

विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा योजनांतर्गत जलशुध्दीकरण केंद्र व उपांगाच्या ठिकाणी पाणी शुध्दीकरणासाठी ॲलम पुरवठा करणे कामी सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा योजनांतर्गत जलशुध्दीकरण केंद्र व उपांगांच्या ठिकाणी पाणी शुध्दीकरणासाठी ॲलम पुरवठा करणे कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम | :- | रु.८२,४५,८१८/- (१८% GST सह) |
| प्रशासकीय मान्यता | :- | प्रशासक ठराव क्र.५२६ दि.०५/०८/२०२४ |
| संविदा मंजूरी | :- | प्रशासकीय ठराव क्र.२४७१ दि.२०/०३/२०२५ |
| मंजूर ठेकेदार | :- | मे. ठक्कर इनऑरगॅनिक्स प्रा.लि. |
| मंजूर दर | :- | ०.२४% कमी दराने |
| स्विकृत निविदा किंमत | :- | रु.८२,२६,०२८/- (१८% GST सह) |
| करारनामा | :- | दि.३१/०३/२०२५ |
| कार्यादेश | :- | जा.क्र.वविशम/पापु/२१/२०२५ दि.०१/०४/२०२५ |
| कामाची मुदत | :- | दि.३१/०३/२०२६ पर्यंत |

महानगरपालिका क्षेत्रास सद्य:स्थितीत सर्व स्त्रोतातून मिळून ३७० द.ल.ली. पाणी पुरवठा होत असून महापालिकेच्या सुर्या, उसगांव व पेल्हार योजनेअंतर्गत धुकटण, पारोळ, पेल्हार व पापडखिंड या ठिकाणी जलशुध्दीकरण केंद्र आहेत. सदर जलशुध्दीकरण केंद्रांवर पाण्याची गढुळता पावसाळयामध्ये जास्त असल्याने नियंत्रीत करण्याकरीता पी. ए.सी. वापरण्यात येते व अन्य वेळी पाण्याची गढुळता कमी असल्याने पाणी शुध्दीकरणासाठी ॲलम वापरण्यात येतो.

सदर कामी अंदाजपत्रक तयार करताना मागील वर्षात प्रत्यक्षात वापर झालेले परिमाण गृहीत धरुन एकूण ६०८ M.T. ॲलम व ८७६ M.T. पी.ए.सी. पुरवठा करण्याचे स्वतंत्र अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. ॲलम पुरवठा करणे कामी मे. ठक्कर इनऑरगॅनिक्स प्रा.लि. व पी.ए.सी. पुरवठा करणे कामी मे. जी. एस.कमर्शिअल यांची नियुक्ती करण्यात आली होती.

परंतू यावर्षी पावसाळा माहे मे, २०२५ पासुन सुरु झाला व दि. ५ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत पर्जन्यवृष्टी सुरु होती. या दरम्यान पावसाळा अल्प प्रमाणात होत राहील्याने पाण्याची गढुळता अल्प प्रमाणात कायम राहिल्याने पी.ए.सी. ऐवजी ॲलमच्या साहय्याने नियंत्रीत करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत माहे जानेवारी, २०२६ पर्यंत जलशुध्दीकरण केंद्रात वापरण्यात आलेल्या पी.ए.सी व ॲलमचा तपशिल खालील प्रमाणे

| अ.क्र. | ठिकाण | वापरण्याचा तपशिल | | शिल्लक साठा |
|---|---|---|---|---|
| | | पी.ए.सी. निविदा क्र. ११११७८२ | ॲलम निविदा क्र. ११२१८४१ | ॲलम |
| १. | धूकटण जलशुध्दीकरण केंद्र | ४०६.९०५ M.T. | ७११.२०० M.T. | ८९.३६० M.T. |
| २. | पारोळ जलशुध्दीकरण केंद्र | ७३.४५० M.T. | ११८.१८५ M.T. | १२.१९५ M.T. |
| ३. | पेल्हार जलशुध्दीकरण केंद्र | - | १२८.८१० M.T. | १०.२०० M.T. |
| ४. | फुलपाडा जलशुध्दीकरण केंद्र | - | ४२.३३० M.T. | ५.२०० M.T. |
| ५. | बोळींज मलनिस्सारण केंद्र | - | ४२.०८० M.T. | १०.७४२ M.T. |
| | **एकूण** | **४८०.३५५M.T.** | **१०४२.७१५M.T.** | **१२७.६९७ M.T.** |
| ६. | माहे मे, २०२६ पर्यंतची संभाव्य मागणी | - | ५० M.T. | - |
| | **एकूण** | - | **१०९२.७१५M.T.** | - |

उपरोक्त नमूद प्रमाणे माहे नोव्हेंबर, २०२५ पर्यंत एकूण ४८०.३५५ M.T. पी. ए.सी. व माहे जानेवारी, २०२६ पर्यंत १०४२.७१५ M.T. ॲलम वापरण्यात आला आहे. मंजूर दरानुसार पी.ए.सी. पुरवठा करण्याच्या निविदेअंतर्गत रक्कम रु. ५६,२३,६२२/- इतकी बचत झाली असून ॲलम पुरवठा करण्याच्या निविदेअंतर्गत रक्कम रु. ५८,८१,६४२/- इतका खर्च जादा होणार आहे.

पाणी पुरवठा ही अत्यावश्यक व जीवनावश्यक बाब असल्याने मे. ठक्कर इनऑरगॅनिक्स प्रा. लि. जि. रायगड यांच्यामार्फत निविदेतील मंजूर दरानुसार ॲलम पुरवठा करुन घेऊन महानगरपालिकेची संभाव्य गैरसोय टाळण्यात आली आहे.

विषयांकीत कामाची मुदत माहे दि. ३१ मार्च, २०२६ पर्यंत असून सदर कामी त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरिता नव्याने निविदा कार्यवाही प्रस्तावित केली आहे. सदर कामी नवीन ठेकेदाराची नियुक्ती माहे मे पर्यंत अपेक्षित असून सदर कालावधीत अतिरिक्त ५० M.T ॲलमची मागणी अपेक्षीत आहे. त्यामुळे निविदेअंतर्गत एकूण ४८४.७१५ M.T ॲलमचा पुरवठा अतिरिक्त होणार असुन मंजूर निविदा दरानुसार रक्कम रु. ६५,५८,१३६/- इतका खर्च मुळ प्रशासकीय व वित्तीय मान्यतेच्या रक्कमेवर जादा होणार आहे.

"महाराष्ट्र सार्व. बांधकाम नियम पुस्तिकामधील नियम १३४ ब नुसार एखाद्या कामात फेरबदल करावयाचे असतील अशा प्रकरणी आवश्यक असेल तेथे तपशिलवार पुरक किंवा सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्याची वाट न बघता सक्षम प्राधिकरणाची सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळाली पाहिजे असे निर्देश आहेत." सदर तरतुदीनुसार अतिरिक्त खर्च मुळ निविदेच्या प्रशासकीय व वित्तीय मान्यतेच्या रक्कमेवर गृहीत धरता निविदेअंतर्गत याकामी एकूण होणाऱ्या रू.१,४७,८४,१६४/- खर्चास सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता आवश्यक आहे.

तरी वसई विरार शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा योजनांतर्गत जलशुध्दीकरण केंद्र व उपांगाच्या ठिकाणी पाणी शुध्दीकरणासाठी ॲलम पुरवठा करणे कामी मे. ठक्कर इनऑरगॅनिक्स प्रा. लि. यांच्या निवीदेस भाववाढ न देता माहे दि. ३१ मे, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यास व होणाऱ्या रक्कम रु. १,४७,८४,१६४/- (१८% GST सह) खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांची सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस्तव सविनय सादर.

---

**ठराव** :- १) पाणी पुरवठा ही अत्यावश्यक व जिवनावश्यक बाब असल्याने मे. ठक्कर इनऑरगॅनिक्स प्रा. लि. यांच्या निविदेअंतर्गत मंजूर दरानुसार माहे जानेवारी , २०२६ पर्यंत एकूण **१०४२.७१५ M.T.** ॲलमचा पुरवठा करुन घेण्यात आला आहे.

२) वसई विरार शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा योजनांतर्गत जलशुध्दीकरण केंद्र व उपांगाच्या ठिकाणी पाणी शुध्दीकरणासाठी ॲलम पुरवठा करणे कामी कामास मे. ठक्कर इनऑरगॅनिक्स प्रा. लि. यांच्या निविदेस माहे दि. ३१ मे, २०२६ पर्यंत कोणतीही मुल्यवर्धीत भाववाढ न देता मुदतवाढ देण्यात येत आहे.

३) उपरोक्त कामी मे. ठक्कर इनऑरगॅनिक्स प्रा. लि. यांच्या निविदेअंतर्गत होणाऱ्या रक्कम रु. १,४७,८४,१६४/- (१८% GST सह) खर्चास सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

मनोजकुमार सुर्यवंशी (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (प.) जि. पालघर, पिन नं.४०१३०३
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल :- vasaivirarcorporation@yahoo.com

**प्रशासकीय ठराव क्र.** 2223

**विभाग : बांधकाम**
**दिनांक :** 02/02/2026

विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती जी कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ७४ मध्ये वालीव भुतपाडा येथील घनश्याम सिंग यांचे घर ते प्रभाकर कोलेकर यांच्या घरापर्यंत पाईप गटार बांधणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करून संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

लेखाशिर्ष :- प्रभाग समिती स्तरावरील विकास कामे
योजनेचे नाव :-
अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. २,९८,१६१/-
तांत्रिक मान्यता रक्कम :- रु. २,९८,१६१/-
निविदा रक्कम :- रु. २,९८,१६१/-
प्रशासकीय मान्यता
आदेश / ठराव क्र. :- १० दिनांक : २६/०९/२०२५
प्रशासकीय मान्यतेची रक्कम :- २,९८,१६१/-
तांत्रिक मान्यता क्रमांक :- ७/४५ दिनांक : २९/०९/२०२५
ई-निविदा सूचना प्रसिध्दी दि.:- २७/११/२०२५ वृत्तपत्र निविदा प्रसिध्दी दिनांक :- २८/११/२०२५
वृत्तपत्रांची नांवे :- दै. पुर्णविराम
ई-निविदा प्रसिध्दी :- दि. ०१/१२/२०२५ वेळ :- दु.३.०० पासून ते दि. :- ०९/१२/२०२५ वेळ दु.३.०० पर्यंत.
ई-निविदाद्वारे विहित
प्रथम लिफाफा उघडल्याची दि. :- १०/१२/२०२५
द्वितीय लिफाफा उघडल्याची दि. :- १२/१२/२०२५
मुदतीत प्राप्त निविदा संख्या :- ०३
प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी :- उप अभियंता
(ज्यांच्या डीएससीने निविदा उघडल्या त्यांची नावे नमूद करावीत) :- उप अभियंता (सतीशकुमार सूर्यवंशी)
प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | निविदाधारकाचे नाव | निविदा दर | निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरीटीबाबतचा धनाकर्षाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १. | मे. हृषिकेश पाटील | (+) ३.००% जादा दराने | - |
| **२.** | **मे. गणेश पवार** | **अंदाजपत्रकीय दराने** | - |
| ३. | मे. निलेश पवार | (+) २.००% जादा दराने | - |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याची तुलना करता **मे. गणेश पवार** यांची **अंदाजपत्रकीय दराची** निविदा प्राप्त झालेली आहे. सदर निविदांची तुलना केली असता **मे. गणेश पवार** यांच्या निविदेतील **अंदाजपत्रकीय दराची** निविदा ही तुलनात्मकरित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी आहे.

तरी **मे. गणेश पवार** यांच्या **अंदाजपत्रकीय दराच्या** निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) अन्वये मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांची मान्यता मिळणेस्तव सविनय सादर.

याकामी संविदा मंजुरी करणे, लघुत्तम निविदाधारकांसोबत करारनामा करून कार्यादेश देणे, काम सुरू करून विहित मुदतीत पुर्ण करणे व देयक सादर करणे इ. सर्व प्रक्रिया पुढील नमुद कालमर्यादेत पुर्ण होणे अपेक्षित आहे.

| अ.क्र. | बाब | अपेक्षित दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव | ठराव क्र. १०, दि. २६/०९/२०२५ |
| २ | कार्यकारी तथा शहर अभियंता हयांची तांत्रिक मंजुरी घेणे | २९/०९/२०२५ |
| ३ | निविदा प्रसिध्दी | २७/११/२०२५ |
| ४ | प्रथम लखोटा उघडणे | १०/१२/२०२५ |
| ५ | द्वितीय लखोटा उघडणे | १२/१२/२०२५ |
| ६ | संविदा मंजुरी ठराव | ०९/०२/२०२६ |
| ७ | करारनामा करणे कार्यादेश देणे | १८/०२/२०२६ |
| ८ | काम सुरू करणे | २०/०२/२०२६ |
| ९ | काम पुर्ण करणे | २०/०४/२०२६ |
| १० | देयक सादर करणे | २८/०४/२०२६ |
| ११ | देयकांचे प्रदान करणे | ०६/०५/२०२६ |

**ठराव :-** सदर कामी संविदा मंजुरी करणे, लघुत्तम निविदाधारकांसोबत करारनामा करून कार्यादेश देणे, काम सुरू करून विहित मुदतीत पुर्ण करणे व देयक सादर करणे इ. सर्व प्रक्रिया पुढील नमुद कालमर्यादेत पुर्ण होणे अपेक्षित आहे.


| अ.क्र. | बाब | अपेक्षित दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव | ठराव क्र. १०, दि. २६/०९/२०२५ |
| २ | कार्यकारी तथा शहर अभियंता हयांची तांत्रिक मंजुरी घेणे | २९/०९/२०२५ |
| ३ | निविदा प्रसिध्दी | २७/११/२०२५ |
| ४ | प्रथम लखोटा उघडणे | १०/१२/२०२५ |
| ५ | द्वितीय लखोटा उघडणे | १२/१२/२०२५ |
| ६ | संविदा मंजुरी ठराव | ०९/०२/२०२६ |
| ७ | करारनामा करणे कार्यादेश देणे | १८/०२/२०२६ |
| ८ | काम सुरू करणे | २०/०२/२०२६ |
| ९ | काम पुर्ण करणे | २०/०४/२०२६ |
| १० | देयक सादर करणे | २८/०४/२०२६ |
| ११ | देयकांचे प्रदान करणे | ०६/०५/२०२६ |

**निर्णय :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अन्वये आयुक्त यांच्याकडील आदेश जा.क्र. वविशम/ लेखा/ ७७/२०२५, दि. ०४/०८/२०२५ अन्वये महानगरपालिकेच्या कामकाज सोयीच्या दृष्टीने उपायुक्त व अति. आयुक्त यांना अधिकार प्रदान केले आहेत. वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'जी' कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ७४ मध्ये वालीव भुतपाडा येथील घनश्याम सिंग यांचे घर ते प्रभाकर कोलेकर यांच्या घरापर्यंत पाईप गटार बांधणे कामी **मे. गणेश पवार** यांची **अंदाजपत्रकीय दराने** दराची निविदा ही इतर निविदेच्या तुलनेत कमी, योग्य व वाजवी असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये **अंदाजपत्रकीय दराने** दराच्या निविदेस संविदा करणेस व नामंजुर ठेकेदाराची इसारा रक्कम परत करणेस मान्यता देत आहे. तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देत आहे. तसेच इस्टीमेट मधील प्रत्येक टप्प्यावरील कामाचे Geo Tagged फोटोग्राफ्स सादर करणेत यावे. तदनंतरच कामाची रक्कम अदा करणेत यावी.

उप आयुक्त
परिमंडळ - ४
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (प.) जि. पालघर, पिन नं.४०१३०३

दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७

ई-मेल :- vasaivirarcorporation@yahoo.com


---

**प्रशासकीय ठराव क्र.** 2228

**विभाग : बांधकाम**

**दिनांक :** 02/02/2026

---

विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती जी कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ७४ मध्ये प्रसाद गुप्ता यांचे घर ते प्रशांत जाधव यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण (पाथवे) करणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करून संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

लेखाशिर्ष :- प्रभाग समिती स्तरावरील विकास कामे

योजनेचे नाव :-

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. २,९६,६६२/-

तांत्रिक मान्यता रक्कम :- रु. २,९६,६६२/-

निविदा रक्कम :- रु. २,९६,६६२/-

प्रशासकीय मान्यता आदेश / ठराव क्र. :- ११ दिनांक : २६/०९/२०२५

प्रशासकीय मान्यतेची रक्कम :- २,९६,६६२/-

तांत्रिक मान्यता क्रमांक :- ८/४६ दिनांक : २९/०९/२०२५

ई-निविदा सूचना प्रसिध्दी दि.:- २७/११/२०२५ वृत्तपत्र निविदा प्रसिध्दी दिनांक :- २८/११/२०२५

वृत्तपत्रांची नांवे :- दै. पुर्णविराम

ई-निविदा प्रसिध्दी :- दि. ०१/१२/२०२५ वेळ :- दु.३.०० पासून ते दि. :- ०९/१२/२०२५ वेळ दु.३.०० पर्यंत.

ई-निविदाद्वारे विहित

प्रथम लिफाफा उघडल्याची दि. :- १०/१२/२०२५

द्वितीय लिफाफा उघडल्याची दि. :- १२/१२/२०२५

मुदतीत प्राप्त निविदा संख्या :- ०३

प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी :- उप अभियंता

(ज्यांच्या डीएससीने निविदा उघडल्या त्यांची नावे नमूद करावीत) :- उप अभियंता (सतीशकुमार सूर्यवंशी)

प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | निविदाधारकाचे नाव | निविदा दर | निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरीटीबाबतचा धनाकर्षाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १. | मे. निलेश पवार | (+) २.००% जादा दराने | - |
| **२.** | **मे. गणेश पवार** | **अंदाजपत्रकीय दराने** | - |
| ३. | मे. हृषिकेश पाटील | (+) ३.००% जादा दराने | - |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याची तुलना करता **मे. गणेश पवार** यांची **अंदाजपत्रकीय दराची** निविदा प्राप्त झालेली आहे. सदर निविदांची तुलना केली असता **मे. गणेश पवार** यांच्या निविदेतील **अंदाजपत्रकीय दराची** निविदा ही तुलनात्मकरित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी आहे.

तरी **मे. गणेश पवार** यांच्या **अंदाजपत्रकीय दराच्या** निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) अन्वये मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांची मान्यता मिळणेस्तव सविनय सादर.

याकामी संविदा मंजुरी करणे, लघुत्तम निविदाधारकांसोबत करारनामा करून कार्यादेश देणे, काम सुरू करून विहित मुदतीत पुर्ण करणे व देयक सादर करणे इ. सर्व प्रक्रिया पुढील नमुद कालमर्यादेत पुर्ण होणे अपेक्षित आहे.

| अ.क्र. | बाब | अपेक्षित दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव | ठराव क्र. ११, दि. २६/०९/२०२५ |
| २ | कार्यकारी तथा शहर अभियंता हयांची तांत्रिक मंजुरी घेणे | २९/०९/२०२५ |
| ३ | निविदा प्रसिध्दी | २७/११/२०२५ |
| ४ | प्रथम लखोटा उघडणे | १०/१२/२०२५ |
| ५ | द्वितीय लखोटा उघडणे | १२/१२/२०२५ |
| ६ | संविदा मंजुरी ठराव | ०९/०२/२०२६ |
| ७ | करारनामा करणे कार्यादेश देणे | १८/०२/२०२६ |
| ८ | काम सुरू करणे | २०/०२/२०२६ |
| ९ | काम पुर्ण करणे | २०/०४/२०२६ |
| १० | देयक सादर करणे | २८/०४/२०२६ |
| ११ | देयकांचे प्रदान करणे | ०६/०५/२०२६ |

**ठराव :-** सदर कामी संविदा मंजुरी करणे, लघुत्तम निविदाधारकांसोबत करारनामा करून कार्यादेश देणे, काम सुरू करून विहित मुदतीत पुर्ण करणे व देयक सादर करणे इ. सर्व प्रक्रिया पुढील नमुद कालमर्यादेत पुर्ण होणे अपेक्षित आहे.

| अ.क्र. | बाब | अपेक्षित दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव | ठराव क्र. ११, दि. २६/०९/२०२५ |
| २ | कार्यकारी तथा शहर अभियंता हयांची तांत्रिक मंजुरी घेणे | २९/०९/२०२५ |
| ३ | निविदा प्रसिध्दी | २७/११/२०२५ |
| ४ | प्रथम लखोटा उघडणे | १०/१२/२०२५ |
| ५ | द्वितीय लखोटा उघडणे | १२/१२/२०२५ |
| ६ | संविदा मंजुरी ठराव | ०९/०२/२०२६ |
| ७ | करारनामा करणे कार्यादेश देणे | १८/०२/२०२६ |
| ८ | काम सुरू करणे | २०/०२/२०२६ |
| ९ | काम पुर्ण करणे | २०/०४/२०२६ |
| १० | देयक सादर करणे | २८/०४/२०२६ |
| ११ | देयकांचे प्रदान करणे | ०६/०५/२०२६ |

**निर्णय :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अन्वये आयुक्त यांच्याकडील आदेश जा.क्र. वविशम/ लेखा/ ७७/२०२५, दि. ०४/०८/२०२५ अन्वये महानगरपालिकेच्या कामकाज सोयीच्या दृष्टीने उपायुक्त व अति. आयुक्त यांना अधिकार प्रदान केले आहेत. वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'जी' कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ७४ मध्ये प्रसाद गुप्ता यांचे घर ते प्रशांत जाधव यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण (पाथवे) करणे कामी **मे. गणेश पवार** यांची **अंदाजपत्रकीय दराने** दराची निविदा ही इतर निविदेच्या तुलनेत कमी, योग्य व वाजवी असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये **अंदाजपत्रकीय दराने** दराच्या निविदेस संविदा करणेस व नामंजुर ठेकेदाराची इसारा रक्कम परत करणेस मान्यता देत आहे. तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देत आहे. तसेच इस्टीमेट मधील प्रत्येक टप्प्यावरील कामाचे Geo Tagged फोटोग्राफ्स सादर करणेत यावे. तदनंतरच कामाची रक्कम अदा करणेत यावी.

उप आयुक्त
परिमंडळ - ४
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (प.) जि. पालघर, पिन नं.४०१३०३
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल :- vasaivirarcorporation@yahoo.com

**प्रशासकीय ठराव क्र.** 2225 **विभाग : बांधकाम**
**दिनांक :** 02/02/2026

विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती जी कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ७४ मध्ये वालीव भुतपाडा येथील अनिल जाधव यांचे घर ते विजय गोरेकर यांच्या घरापर्यंत पाईप गटार बांधणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करून संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

लेखाशिर्ष :- प्रभाग समिती स्तरावरील विकास कामे
योजनेचे नाव :-
अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. २,९३,६१९/- तांत्रिक मान्यता रक्कम :- रु. २,९३,६१९/-
निविदा रक्कम :- रु. २,९३,६१९/-
प्रशासकीय मान्यता
आदेश / ठराव क्र. :- ०९ दिनांक : २६/०९/२०२५
प्रशासकीय मान्यतेची रक्कम :- २,९३,६१९/-
तांत्रिक मान्यता क्रमांक :- ७/४४ दिनांक : २९/०९/२०२५
ई-निविदा सूचना प्रसिध्दी दि.:- २७/११/२०२५ वृत्तपत्र निविदा प्रसिध्दी दिनांक :- २८/११/२०२५
वृत्तपत्रांची नांवे :- दै. पुर्णविराम
ई-निविदा प्रसिध्दी :- दि. ०१/१२/२०२५ वेळ :- दु.३.०० पासून ते दि. :- ०९/१२/२०२५ वेळ दु.३.०० पर्यंत.
ई-निविदाद्वारे विहित
प्रथम लिफाफा उघडल्याची दि. :- १०/१२/२०२५
द्वितीय लिफाफा उघडल्याची दि. :- १२/१२/२०२५
मुदतीत प्राप्त निविदा संख्या :- ०३
प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी :- उप अभियंता
(ज्यांच्या डीएससीने निविदा उघडल्या त्यांची नावे नमूद करावीत) :- उप अभियंता (सतीशकुमार सूर्यवंशी)
प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | निविदाधारकाचे नाव | निविदा दर | निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरीटीबाबतचा धनाकर्षाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १. | **मे. गणेश पवार** | **अंदाजपत्रकीय दराने** | - |
| २. | मे. निलेश पवार | (+) २.००% जादा दराने | - |
| ३. | मे. हृषिकेश पाटील | (+) ३.००% जादा दराने | - |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याची तुलना करता **मे. गणेश पवार** यांची **अंदाजपत्रकीय दराची** निविदा प्राप्त झालेली आहे. सदर निविदांची तुलना केली असता **मे. गणेश पवार** यांच्या निविदेतील **अंदाजपत्रकीय दराची** निविदा ही तुलनात्मकरित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी आहे.

तरी **मे. गणेश पवार** यांच्या **अंदाजपत्रकीय दराच्या** निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) अन्वये मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांची मान्यता मिळणेस्तव सविनय सादर.

याकामी संविदा मंजुरी करणे, लघुत्तम निविदाधारकांसोबत करारनामा करून कार्यादेश देणे, काम सुरू करून विहित मुदतीत पुर्ण करणे व देयक सादर करणे इ. सर्व प्रक्रिया पुढील नमुद कालमर्यादेत पुर्ण होणे अपेक्षित आहे.

| अ.क्र. | बाब | अपेक्षित दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव | ठराव क्र. ०९, दि. २६/०९/२०२५ |
| २ | कार्यकारी तथा शहर अभियंता ह्यांची तांत्रिक मंजुरी घेणे | २९/०९/२०२५ |
| ३ | निविदा प्रसिध्दी | २७/११/२०२५ |
| ४ | प्रथम लखोटा उघडणे | १०/१२/२०२५ |
| ५ | द्वितीय लखोटा उघडणे | १२/१२/२०२५ |
| ६ | संविदा मंजुरी ठराव | ०९/०२/२०२६ |
| ७ | करारनामा करणे कार्यादेश देणे | १८/०२/२०२६ |
| ८ | काम सुरू करणे | २०/०२/२०२६ |
| ९ | काम पुर्ण करणे | २०/०४/२०२६ |
| १० | देयक सादर करणे | २८/०४/२०२६ |
| ११ | देयकांचे प्रदान करणे | ०६/०५/२०२६ |

**<u>ठराव :-</u>** सदर कामी संविदा मंजुरी करणे, लघुत्तम निविदाधारकांसोबत करारनामा करून कार्यादेश देणे, काम सुरू करून विहित मुदतीत पुर्ण करणे व देयक सादर करणे इ. सर्व प्रक्रिया पुढील नमुद कालमर्यादेत पुर्ण होणे अपेक्षित आहे.

| अ.क्र. | बाब | अपेक्षित दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव | ठराव क्र. ०९, दि. २६/०९/२०२५ |
| २ | कार्यकारी तथा शहर अभियंता ह्यांची तांत्रिक मंजुरी घेणे | २९/०९/२०२५ |
| ३ | निविदा प्रसिध्दी | २७/११/२०२५ |
| ४ | प्रथम लखोटा उघडणे | १०/१२/२०२५ |
| ५ | द्वितीय लखोटा उघडणे | १२/१२/२०२५ |
| ६ | संविदा मंजुरी ठराव | ०९/०२/२०२६ |
| ७ | करारनामा करणे कार्यादेश देणे | १८/०२/२०२६ |
| ८ | काम सुरू करणे | २०/०२/२०२६ |
| ९ | काम पुर्ण करणे | २०/०४/२०२६ |
| १० | देयक सादर करणे | २८/०४/२०२६ |
| ११ | देयकांचे प्रदान करणे | ०६/०५/२०२६ |

**निर्णय :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अन्वये आयुक्त यांच्याकडील आदेश जा.क्र. वविशम/ लेखा/ ७७/२०२५, दि. ०४/०८/२०२५ अन्वये महानगरपालिकेच्या कामकाज सोयीच्या दृष्टीने उपायुक्त व अति. आयुक्त यांना अधिकार प्रदान केले आहेत. वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'जी' कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ७४ मध्ये वालीव भुतपाडा येथील अनिल जाधव यांचे घर ते विजय गोरेकर यांच्या घरापर्यंत पाईप गटार बांधणे कामी **मे. गणेश पवार** यांची **अंदाजपत्रकीय दराने** दराची निविदा ही इतर निविदेच्या तुलनेत कमी, योग्य व वाजवी असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये **अंदाजपत्रकीय दराने** दराच्या निविदेस संविदा करणेस व नामंजुर ठेकेदाराची इसारा रक्कम परत करणेस मान्यता देत आहे. तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देत आहे. तसेच इस्टीमेट मधील प्रत्येक टप्प्यावरील कामाचे Geo Tagged फोटोग्राफ्स सादर करणेत यावे. तदनंतरच कामाची रक्कम अदा करणेत यावी.

उप आयुक्त
परिमंडळ - ४
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५

दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७.

ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com


---

**प्रशासकीय ठराव क्र. २२२६**

विभाग :- परिवहन

दिनांक :- ०२/०२/२०२६

---

**प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका परिवहन सेवेसाठी घेण्यात येणाऱ्या ई-टिकिटींग मशीन साठी स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये नव्याने खाते उघडणे व नव्याने स्मार्ट कार्ड खरेदी करुन त्याचा वापर करणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकुर :-** वसई - विरार शहर महानगरपालिकेची परिवहन सेवा दि. ०३ ऑक्टोंबर, २०१२ पासून सुरु झालेली असून सदरची सेवा मे. एस.एन.एन (भागिदारी संस्था) यांना BOOM (Buy, Own, Operate & maintain)तत्वावर रॉयल्टी बेसिसवर चालविण्यास देण्यात आलेली आहे. सदरची परिवहन सेवा ही BOOM तत्वावर असल्याने यासाठीची तिकिट प्रणाली ही बस ऑपरेटर यांनी त्यांच्या कार्यप्रणालीनुसार तयार केलेली आहे. त्यासाठी कोणत्याही प्रकारचा युझर इंटरफेस तयार करण्यात आलेला नसून सद्यस्थितीत साध्या मशीनव्दारे तिकिट काढले जाते.

सद्यस्थितीत MMRDA अंतर्गत तयार करण्यात येणाऱ्या "मुंबई वन अॅप" साठी महापालिकेचा सहभाग दर्शविण्यात आलेला होता. परंतु, "मुंबई वन अॅप्लिकेशन" हे स्मार्ट अॅप असल्यामुळे महानगरपालिकेची सद्यस्थितीत असणारी टिकिटींग प्रणाली या अॅपमध्ये अंतर्भूत करणे तांत्रिकदृष्टया शक्य नाही. तसेच मंबई वन अॅप्लिकेशन मध्ये समाविष्ट असलेल्या सर्व परिवहन सेवा या GCC तत्वावर सुरु आहेत. त्यामुळे त्यांचेकडे त्यांचे स्वत:चे ई-टिकिटींग प्रणालीचे अद्यावत युझर इंटरफेस आहेत. त्यामुळे ते मुंबई वन अॅपमध्ये सहजरित्या अंतर्भूत झालेले आहेत. तसेच वसई विरार शहर महानगरपालिका परिवहन सेवेत एकूण १२० बस कार्यरत असून त्यासाठी लागणाऱ्या ई-टिकिटींग कार्यप्रणालीसाठी अंदाजे ३०० नग ई-टिकिट स्मार्ट मशीन बदलणे व त्यासाठी लागणारा युझर इंटरफेस तयार करणे गरजेचे आहे. यापैकी ई-टिकिट स्मार्ट मशीन या SBI बँकेमार्फत ना नफा ना तोटा या आधारावर महानगरपालिकेस पुरविण्यात येणार असून त्यासाठी लागणारे युजर इंटरफेस तयार करणे व मुंबई वन अॅपमध्ये इंटिग्रेड करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने युजर इंटरफेस तयार करण्यात आलेला असून त्याकामी अद्यावत टिकिटींग मशीन यांची आवश्यकता भासणार आहे. यासाठी स्टेट बँक ऑफ इंडिया यांचेशी संपर्क साधला असता त्यांच्याकडून सदरच्या मशीनन्स विनामुल्य प्राप्त होणार होत्या. परंतु, यासाठी महानगरपालिकेचे या बँकेत दैनंदिन संकलन खाते असणे आवश्यक आहे. असे सांगण्यात आले. त्याप्रमाणे संदर्भ क्र. २ नुसार त्यांनी ई-मेलव्दारे महानगरपालिकेस कळविलेले आहे.

महानगरपालिकेची परिवहन सेवा ही बुम तत्वावर चालत असून होणाऱ्या प्रवाशांचे तिकिटांचे संकलन हे मे. एस.एन.एन यांचेमार्फत होत आहे. तिकिटांपोटी प्राप्त रक्कम चालु खात्यामध्ये जमा करुन यामुधन त्यांचे दैनंदिन इंधन खर्च, दुरुस्ती खर्च व इतर अनुषंगिक खर्च करण्यात येतात. ज्यामुळे परिवहन सेवा सुरळीत सुरु राहणेस मदत होते. परंतु, स्टेट बँक ऑफ इंडिया यांचेसाठी मे. एस.एन.एन हे एक खाजगी कंपनीधारक असून त्यांना टिकिटींग मशीन या विनामुल्य देता येणे शक्य नाही असे सांगितले, तसेच त्यांना विनामुल्य टिकिटींग मशीन द्यावयाच्या झाल्यास मे. एस.एन.एन यांच्या चालु खात्यामध्ये र.रु. ३ कोटी इतके सुरक्षा अनामत ठेवणे गरजेचे असून चालु खत्यामध्ये दैनंदिन रु. ३० लक्ष इतकी रक्कम जमा करणे आवश्यक असलेबाबतची अटी व शर्ती नमूद केलेल्या आहेत. तसेच सदरच्या मशीन भाडे तत्वावर दिल्यास प्रती मशीन प्रती माहे रु. ८००/- व इतर अनुषंगिक खर्च यासाठी सध्या आवश्यक असणाऱ्या ३०० मशीन व पी एम ईबस सेवेसाठी आवश्यक असणाऱ्या ३०० अशा एकूण ६०० मशीनसाठी प्रती माहे र.रु. ५ लक्ष ते ५.५० लक्ष व

वार्षिक र.रु. ६० ते ६६ लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च हा मे. एस.एन.एन यांचेवर वाढीव खर्च असून हा खर्च मे. एस.एन.एन यांनी करण्यास नकार दिलेला आहे. या मशीनसाठी महानगरपालिकेचे स्वतंत्र चालु खाते सुरु केल्यास आर्थिक बचत होण्यास मदत होईल. सदरचे खाते हे महानगरपालिकेमार्फत सुरु करणेसाठी अडथळा येत आहे. कारण परिवहन सेवेतील तिकिटांचे दैनंदिन संकलन हे मे. एस.एन.एन यांचे खात्यामध्ये होत आहे. करिता परिवहन सेवेतील तिकिट रकमांचे दैनंदिन संकलन महानगरपालिकेच्या खात्यामध्ये करुन ते पुढील ४८ तासांत मे. एस.एन.एन यांचे खात्यावर विना परवानगी जमा केल्यास सदरच्या मशीन विनामुल्य घेता येणे शक्य होईल. याबाबत मे. एस.एन.एन यांनी देखील सहमती दर्शविलेली आहे. तसेच दैनंदिन संकलन खात्याऐंवजी चालु खाते उघडल्यास संकलित केलेली तिकिटांची रक्कम मे. ए.एन.एन यांचे खत्यात जमा करणेसाठी महानगरपालिकेच्या पूर्व परवानग्यांची आवश्यकता लागणार आहे. यामुळे सदरच्या तिकिटांची रक्कमेमधुन त्यांच्या दैनंदिन दुरुस्ती व इंधन खर्च भागविणे मे.एस.एन.एन यांना शक्य होणार नसलेबाबत त्यांचेकडून सांगण्यात आले.

तरी या उपरोक्त सर्व बाबींचा विचार केल्यास वसई विरार शहर महानगरपालिका परिवहन सेवेसाठी घेण्यात येणाऱ्या ई-टिकिटींग मशीन साठी स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये महानगरपालिकेचे नव्याने चालु खाते उघडणेबाबत उचित निर्णय होवून पुढील कार्यवाहीस्तव प्रस्ताव सविनय सादर.

---

**ठराव / निर्णय :-** वसई विरार शहर महानगरपालिका परिवहन सेवेसाठी घेण्यात येणाऱ्या ई-टिकिटींग मशीन साठी स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये महानगरपालिकेचे नव्याने चालु खाते उघडण्यात येवून सदर बँक खात्याचे व्यवहार परिवहन व्यवस्थापक यांचे स्वाक्षरीने करण्यात यावे. याचप्रमाणे या खात्यावरील व्यवहाराची संपूर्ण जबाबदारी परिवहन व्यवस्थापक यांची ठेवण्यात यावी आणि सदर बँक खात्यात होणारी जमा ही महापालिकेचे उत्पन्न नसल्याने सदर रकमेची नोंद मनपा लेख्यांमध्ये घेण्यात येवू नये. तसेच ई-टिकिटींग मशिनव्दारे तिकिट देणे व महानगरपालिकेमार्फत राबविणेत येणाऱ्या विविध योजनांकरिता नव्याने स्मार्ट कार्ड खरेदी करुन त्याचा वापर करणे, त्यासाठी होणाऱ्या उपाययोजना करणे व बस ऑपरेटर मे. एस.एन.एन (भागिदारी संस्था) यांना त्यानुसार सवलतीपोटी येणारे देयक अदा करणेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे.

मनोजकुमार सूर्यवंशी (भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, विरार (पश्चिम), जि. पालघर, पिन.४०१ ३०३**

**प्रशासकीय ठराव क्र.** 2226 **विभाग : स्मशानभूमी विभाग**

**दिनांक :** 02/02/२०२६

**प्रस्तावाचा विषय :** वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील स्मशानभूमीत प्रेत दहनाकरिता सन २०२४-२५ या वित्तीय वर्षात जळाऊ लाकडांचा पुरवठा करणेच्या निविदेस **मुदतवाढ मिळणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :** वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील स्मशानभूमीमध्ये सन २०२४-२५ या वित्तीय वर्षात जळाऊ लाकडांचा पुरवठा करणेकामी प्राप्त निविदांपैकी मे. श्री शंकर टिंबर ट्रेडिंग यांच्या लघुतम दर रु.४,७४९/- (अक्षरी रुपये चार हजार सातशे एकोणपन्नास मात्र) प्रती टन सर्व करांसहित इतक्या दराच्या निविदेस मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी प्रशासकीय ठराव क्र.१७८४ दि.१५/१०/२०२४ अन्वये रू.२ कोटी ४० लाख इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिली आहे. त्यानुसार दि.२८/११/२०२४ रोजी करारनामा केला असून जा.क्र.वविशम/स्मशान/३५/२०२४-२५ दि.२९/११/२०२४ अन्वये मे. श्री शंकर टिंबर ट्रेडिंग यांना कार्यादेश दिला आहे. सदर कामाची मुदत दि.३०/११/२०२५ पर्यंत आहे.

उपरोक्त कामी सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरिता नव्याने निविदा कार्यवाही प्रस्तावित केली आहे. सदर प्रस्तावास मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी ठराव क्र.१७१७ दि.१०/१२/२०२५ अन्वये वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील स्मशानभूमीत शव दहनासाठी जळाऊ लाकडांचा पुरवठा करण्याकरिता येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिली आहे.

सदर ठरावानुसार मा. आयुक्त महोदय ह्यांनी नविन निविदा प्रसिद्ध करणेबाबत आदेशित केलेले आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण करणेस किमान दोन ते तीन महिन्यांचा कालावधी अपेक्षित असतो. त्याचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे :

| अ.क्र. | बाब | अपेक्षित दिनांक |
|---|---|---|
| १ | निविदा प्रसिद्ध करणे | २२/१२/२०२५ |
| २ | प्रथम लिफाफा उघडणे | ०२/०१/२०२६ |
| ३ | म्हणणे मांडणेची संधी | ०९/०१/२०२६ |
| ४ | प्रथम लखोटा निविदा समिती | १६/०१/२०२६ |
| ५ | द्वितीय लिफाफा उघडणे | २३/०१/२०२६ |
| ६ | समान दर प्राप्त झाल्यास वाटाघाटी | ३०/०१/२०२६ |
| ६ | संविदा मंजूरी ठराव | ०४/०२/२०२६ |
| ७ | सुरक्षा अनामत भरणे / करारनामा करणे | १२/०२/२०२६ |
| ८ | कार्यादेश देणे / काम सुरु करणे | १३/०२/२०२६ |

**परंतू राज्यातील सर्व जिल्हा परिषद व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रलंबित असलेल्या निवडणूका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत घेण्यात याव्या असे मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश आहेत. सदर निर्देश लक्षात घेता डिसेंबर महिन्यात आचार संहिता जाहीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.**

सदर निविदा प्रसिद्ध केल्यास आणि त्याच कालावधीत आचारसंहिता जाहीर झाल्यास निविदा प्रक्रिया व कार्यादेश देण्याची प्रक्रिया पूर्ण करता येणार नाही व निविदा अपूर्ण अवस्थेत राहील. सदर सेवा ही अत्यावश्यक असल्याने निविदा प्रक्रिया वेळेत पूर्ण न झाल्यास नागरिकांची गैरसोय निर्माण होईल, नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल.

मागील मंजूर ठेक्याची मुदत दि.३०/११/२०२५ पर्यंत आहे. तरी निविदेतील अटी शर्ती क्र.८ मध्ये नमूद केल्यानुसार मुदतवाढ देण्याचा किंवा मुदतीआधी ठेका संपुष्टात आणण्याचा अधिकार मा. आयुक्त तथा प्रशासक, वसई विरार शहर महानगरपालिका यांनी राखून ठेवला आहे तसेच मुदतवाढ दिल्यास मंजूर दराप्रमाणेच जळाऊ लाकूड पुरवठा करावयाचा आहे.

प्रेत दहनासाठी जळाऊ लाकूड पुरवठा करणे हे काम अत्यावश्यक सेवेअंतर्गत येत आहे. वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील ८८ स्मशानभूमीला शव दहनासाठी जळाऊ लाकडे महानगरपालिकेमार्फत मोफत पुरविण्यात येतात करिता प्रत्येक महिन्याला अंदाजे ५०० टन जळाऊ लाकूड पुरवठा होणे अपेक्षित आहे. दि.०१/१२/२०२५ पासून दि.३१/०३/२०२६ पर्यंत मे. श्री शंकर टिंबर ट्रेडिंग यांचेकडून मंजूर दरानुसार जळाऊ लाकूड घेतल्यास रक्कम रु.९४,९८,०००/- (रुपये चौऱ्याण्णव लक्ष अठ्ठ्याण्णव हजार मात्र) इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे.

सदरचा खर्च सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीतील "प्रेत दहन लाकडे खरेदीसह विद्युतहादिनी वापर अनुदान" या लेखाशीर्षाखालील उपलब्ध तरतुदीमधून भागविणे शक्य आहे.

तरी, वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील स्मशानभूमीमध्ये सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात जळाऊ लाकडांचा पुरवठा करणेकामी मंजूर निविदाधारक मे. श्री शंकर टिंबर ट्रेडिंग यांच्या निविदेस दि.०१/१२/२०२५ पासून दि.३१/०३/२०२६ किंवा नवीन ठेकेदाराची नियुक्ती होईपर्यंत कोणतीही दरवाढ न देता मुदतवाढ देण्यास व होणाऱ्या रक्कम रु.९४,९८,०००/- (रुपये चौऱ्याण्णव लक्ष अठ्ठ्याण्णव हजार मात्र) खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस मंजुरीस्तव सादर.

**ठराव / निर्णय :** वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील स्मशानभूमीमध्ये सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात जळाऊ लाकडांचा पुरवठा करणेकामी मंजूर निविदाधारक मे. श्री शंकर टिंबर ट्रेडिंग यांच्या निविदेस दि.०१/१२/२०२५ पासून दि.३१/०३/२०२६ किंवा नवीन ठेकेदाराची नियुक्ती होईपर्यंत कोणतीही दरवाढ न देता मुदतवाढ देण्यास व होणाऱ्या रक्कम रु.९४,९८,०००/- (रुपये चौऱ्याण्णव लक्ष अठ्ठ्याण्णव हजार मात्र) खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करणेत यावी.

**मनोजकुमार सूर्यवंशी** (भा.प्र.से)
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**